# अहवाल

## ग्रामीण विकास योजना व स्थानिक लाभार्थी या विषयी सर्वेक्षण

## स्थळ मेहगाव

सेठ नरसिंगदास मोर कला आणि वाणिज्य व श्रीमती गोदावरीदेवी सराफ विज्ञान महाविद्यालयातील पदवी पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागाद्वारे दि. ४ मे २०२३ रोजी तुमसर तालुक्यातील मेहेगांव येथे ग्रामीण विकास योजना व स्थानिक लाभार्थी या विषयी सर्वेक्षणार्थ भेट देण्यात आली. ग्रामीण भागातील सर्वसामान्य लोकांच्या ग्रामीण विकास योजनाचा लाभ मिळतो का? या संदर्भातील माहिती जाणून घेणे हा या सर्वेक्षणाचा मुख्य हेतू होता. ग्रामीण विकास योजना संदर्भातील ज्ञानाचा ग्रामीण लोकांशी अनुबंध तपासणे तसेच स्थानिक लोकांना ग्रामीण विकास योजनाची माहिती मिळते का? या विषयीची जाणीव जागृती तपासणे हे सुद्धा या सर्वेक्षणाच्या दृष्टीने महत्त्वाचे होते.

या सर्वेक्षणामध्ये एक प्रश्नपत्रिका तयार करून ग्रामीण भागातील लोकांकडून त्याची उत्तरे घेण्यात आली. या प्रश्नामध्ये संबंधित गावातील नागरिकांची वैयक्तिक माहिती आणि कोणकोणत्या योजनांचा लाभ आपल्याला मिळाला आहे. या संबंधीचे प्रश्न विचारण्यात आले होते. परंतु ग्रामीण लोकांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण अधिक असल्यामुळे आणि जाणीवजागृतीचे प्रमाण कमी असल्यामुळे गावातील बहुसंख्य नागरिक अजूनही ग्रामीण विकास योजना संदर्भातील माहिती आणि लाभापासून वंचित असल्याचे लक्षात आले. एकूण उत्तरदात्यांपैकी २५% लोकांना प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, प्रधानमंत्री फसल बीमा योजना, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, प्रधानमंत्री कृषी संचयी योजना आदी योजनांचा लाभ मिळाला असला तरी ७५% नागरिक अजूनही वरील प्रकारच्या ग्रामीण विकास योजनांपासून वंचित असल्याचे आढळून आले. एकूण उत्तरदात्यांपैकी ३०% उत्तरदात्यांना ग्रामीण विकास योजनाची माहिती मिळते तर ७०% उत्तरदात्यांना अजूनही ग्रामीण विकास योजनाविषयीचे किमान ज्ञान नाही, असे दिसून आले.

ग्रामीण विकासाच्या योजना गावा-गावांमध्ये पोहचविण्यासाठी नागरिकांना शासकीय योजनाची योग्यरित्या माहिती व्हावी म्हणून शासनाकडून शासकीय अधिकारी-कर्मचारी, राजकीय नेतृत्व, संबंधित गावातील सरपंच, पोलिस पाटील आदी. तसेच वर्तमानपत्रे, टिव्ही, समाज माध्यमाकडून विशेष सभा-संमेलने, कार्यशाळा घेऊन ग्रामस्यांमध्ये यासंबंधी जाणीव-जागृती निर्माण करण्याची आवश्यकता आहे, असे या सर्वेक्षणातून लक्षात आले. या सर्वेक्षणामध्ये एकूण २७ विद्यार्थी सहभागी झाले. पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. राजेंद्र बेलोकार, डॉ. सचिन वेरूळकर आणि बी. ए. तृतीय वर्षातील विद्यार्थी या उपक्रमात सहभागी झाले होते. तसेच मेहेगांव गावातील गावक-यांनी या उपक्रमासाठी मोलाचे सहकार्य केले.

राज्यशास्त्र विभागप्रमुख